एमएचटीएच१२०१२४३४२०२४

दाखल दिनांक : ०३/०७/२०२४
नोंदणी दिनांक : ०३/०७/२०२४
निकाल दिनांक : १३/०३/२०२५
कालावधी : वर्षे महिने दिवस
००   ०८   १०

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, क. स्तर, बेलापुर, नवी मुंबई यांच्या न्यायालयात</u>**
**{ पिठासीन अधिकारी श्रीमती. एम. एम. मोरे / पावडे }**
( दि.१३ मार्च, २०२५ रोजी पारित )

**नियमित फौजदारी खटला क्र.९७३/२०२४** **निशाणी क्र. ०८**

( पोलिस ठाणे एपीएमसी येथील गुन्हा नोंद क्र.१२९/२०२४, भारतीय दंड विधान कलम ३८१ अन्वये )

**<u>भाग—अ</u>**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष / फिर्यादी | : | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे एपीएमसी, नवी मुंबई.<br>फिर्यादी — रौनक दयालजीभाई भानुशाली<br>वय : सज्ञान, |
| विधिज्ञ | : | श्री. अरूण फाटके, सहा. सरकारी अधिवक्ता,<br>अभियोग पक्षातर्फे |
| आरोपी | : | राकेश कन्नारामजी चौधरी<br>वय : २९ वर्षे,<br>राहणार : रूम क्र.४, शिवशंकर मंदीराजवळ,<br>पी. एल. लोखंडे मार्ग, चेंबूर—पूर्व, मुंबई. |
| सादरकर्ते | : | विद्वान विधिज्ञ श्री. संतोष मोरे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | फेब्रुवारी २०२४ व मार्च २०२४ |
| फिर्याद दाखल तारीख | २८/०३/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १५/०६/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | १९/११/२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | १९/११/२०२४ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | १३/०३/२०२५ |
| निकालाची तारीख | १३/०३/२०२५ |

| | |
|---|---|
| शिक्षा झाल्याची तारीख, शिक्षा झाली असेल तर | —— |

**भाग—ब**

| आरोपींचे विवरण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आरोपींचे अ.क्र. | आरोपींचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ साठी खटला सुरू असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
| १ | राकेश कन्नारामजी चौधरी | सी.आर.पी.सी ४१(१) अन्वये नोटीस. | निरंक | भारतीय दंड विधान कलम ३८१ अन्वये | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |

**भाग—क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार / आरोपीतर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार**

| अभियोग पक्षाचे साक्षीदार | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरूप | निशाणी क्र. |
| साक्षीदार क्र.१ | रौनक दयालजीभाई भानुशाली | फिर्यादी | ०६ |

**ब. आरोपी तर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १ | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| सा.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**<u>अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी</u>**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**ब. आरोपीचा पुरावा**

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशाणी क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | |

**: <u>न्या य नि र्ण य</u> :**

( दि. १३ मार्च, २०२५ रोजी घोषीत )

प्रस्तुत प्रकरणात उपरोक्त आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३८१ अन्वये दोषारोप ठेऊन खटला चालविण्यात आला.

**२.** फिर्यादी यांचे दुकानात माहे फेब्रुवारी २०२४ व मार्च २०२४ मध्ये एकूण २३ किलो वजनाचा व रू.५१,५२०/— किंमतीचा ग्रीन इलायची हा माल विक्रीसाठी ठेवला होता. सदर माल आरोपी याने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरी करून तो मार्केटमध्ये विकून त्यातून आलेल्या पैशांचा स्वत

:चे फायद्याकरीता वापर केला. म्हणून फिर्यादीने आरोपीविरूध्द फिर्याद दाखल केली.

**३.** फिर्यादवरुन पोलिसांनी गुन्हा क्र.१२९/२०२४, भारतीय दंड विधान कलम ३८१ अन्वये गुन्हयाचा तपास पोलीस नाईक सुधीर कृष्णाथ यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले व तपासाअंती आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी नि.क्र.३ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३८१ अन्वये दोषारोप निश्चित करुन आरोपीस वाचून दाखविला. आरोपीने दोषारोप कबुल न करता खटला पुढे चालवावा असे सांगितले. आरोपीविरूध्द गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**५.** उपरोक्त अभियोग पक्षाच्या कथनावरून तसेच अभिलेखावरील कागदपत्रावरून खालील मुदद्े उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणांसहीत नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १) अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, फिर्यादी यांनी त्यांचे दुकानात माहे फेब्रुवारी २०२४ व मार्च २०२४ या कालावधीत एकूण २३ किलो वजनाचा व रू.५१,५२०/— किंमतीचा ग्रीन इलायची हा माल विक्रीसाठी ठेवला असता सदर माल आरोपी याने फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरी करून नेला व त्यायोगे भारतीय दंड विधान कलम ३८१ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |
| २) काय आदेश? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

## कारणमिमांसा

६. आरोपीविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने केवळ एका साक्षीदाराची साक्ष नोंदविली आहे. दोन्ही बाजुंचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

<u>मुददा क्र.१ करीता</u> :—

७. साक्षीदार क्र.१ रौनक दयालजी भानूशाली (निशाणी क्र.१२) यांचे साक्षीपुराव्या असे आले आहे की, त्यांचे स्वस्तिक ट्रेडर नावाचे दुकान गाळा क्र. सी ५४, मसाला मार्केट एपीएमसी येथे किराणा मालाचे होलसेलचे दुकान आहे. साक्षीदाराकडे आरोपीसह इतर ८ ते ९ जण कामाला आहेत. साक्षीदाराच्या दुकानातून फेब्रुवारी २४ ते मार्च २४ चे दरम्यान अंदाजे २३ किलोचे वेलची ही चोरीस गेली होती. सदर मालाची चोरी ही आरोपीने केली असल्याचे त्यांना समजले होते. म्हणून साक्षीदाराने त्याचेविरूध्द तक्रार दिली होती. सदरची तक्रार त्यांनी गैरसमजूतीने दाखल केल्याचे नमूद केले.

८. सदर साक्षीदार क्र.१ यांनी उलटतपासात आरोपी व साक्षीदारामध्ये कोर्टाबाहेर समझोता झाला असून पुढे केस चालवायची नाही तसेच कोणतेही साक्षीदार तपासावयाचे नसल्याचे सांगितले. आरोपीविरूध्द केस बंद केल्यास हरकत नसल्याचे नमूद करत निशाणी क्र.७ वर पुरशीस दाखल केल्याचे सांगितले आहे. साक्षीदार क्र.१ च्या पुराव्यावरून असे दिसून येते की त्यांचा पुरावा हा औपचारीक स्वरूपाचा असल्याने त्याचा अभियोग पक्षास काही उपयोग होणार नाही.

९. उपरोक्त लेखी पुराव्याचे अवलोकन केले असता, तसेच साक्षीदाराचा जबाब पाहिला असता, असे लक्षात आले की, फिर्यादी व आरोपींमधील वाद मिटलेला आहे. त्यामुळे सदर खटल्यातील एकमेव साक्षीदाराने म्हणजेच फिर्यादीने अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही व आरोपींविरूध्द पुरेसा पुरावा न्यायालयासमोर

ठेवला नाही. सदर खटल्यातील प्रमुख साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने अभियोग पक्ष त्याची बाजू सिध्द करू शकला नाही. आरोपींविरूध्द असलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी आवश्यक असलेले घटक अभियोग पक्षाला, संमंजस संदेहाच्या पलीकडे जावून सिध्द करता आले नाही. म्हणून मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता:</u>**

**१०.** अभियोग पक्ष आरोपीविरूध्द ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यास अपयशी ठरला. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी राकेश कन्नारामजी चौधरी यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३८१ अन्वयेच्या दंडनीय असलेल्या अपराधांच्या गुन्हयांमधून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ अंतर्गत रू.१५,०००/— चे बंदपत्र पुढील सहा महिन्यांकरीता द्यावे. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. |

MANGAL MAHESH MORE
Digitally signed by MANGAL MAHESH MORE
Date: 2025.03.15 14:35:22 +0530

सी.बी.डी. बेलापूर.
दिनांक: १३/०३/२०२५

( एम. एम. मोरे / पावडे )
३ रे सह दिवाणी न्यायाधीश व
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बेलापुर, नवी मुंबई.